जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 JUL 2017
सकाळ

# रोजगाराभिमुख विद्यार्थी घडविण्यावर भर : कुलगुरू



डॉ. देवानंद शिंदे

**प्रश्न : कुलगुरूपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर दोन वर्षांच्या कारकीर्दीत काय केले?**

**उत्तर :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी कार्यरत असलेले शिवाजी विद्यापीठ आहे. या विद्यापीठाची सूत्रे स्वीकारल्यानंतर माझ्या कारकिर्दीत विद्यापीठाचा विकास हेच मी ध्येय बाळगले. भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयातर्फे देशातील विद्यापीठांच्या नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क (एनआयआरएफ) या उपक्रमात विद्यापीठाने देशात २८ वा, तर राज्यात प्रथम क्रमांक मिळवला. यू.एस. न्यूज अँड वर्ल्ड रिपोर्ट (अमेरिका) संस्थेच्या यादीत भारतातील बेस्ट ग्लोबल युनिव्हर्सिटीजमध्ये विद्यापीठाने २१ वा क्रमांक मिळविला. करन्ट सायन्स जर्नलच्या स्कोपस आकडेवारीच्या आधारावरील सर्वेक्षणात संशोधनामध्ये विद्यापीठाने देशात मिळवलेला १९ वा क्रमांक विद्यापीठाच्या संशोधनाचा दर्जा स्पष्ट करतो. विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांची वाटचालही आदर्शवत आहे.

**प्रश्न : संशोधनाचा दर्जा वाढविण्यासाठी काय करणार?**

**उत्तर :** संशोधक शिक्षक व विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी रीसर्च सेन्सिटायझेशन ग्रँट, रीसर्च स्टुडंट्स फायनान्शियल असिस्टन्स या संशोधन वृत्तींसाठी विद्यापीठाने नियमावली व आर्थिक तरतूद अर्थसंकल्पामध्ये केली. 'बेस्ट रीसर्चर अॅवॉर्ड' देण्यात येणार आहेत. सी-डॅक, धातुतंत्र प्रबोधिनी, बायरॅक, इंडो-जर्मन टूल रूम आदी राष्ट्रीय संस्थांबरोबरच दक्षिण कोरिया, इस्राईल, यू.के. या देशांतील विद्यापीठांशी सामंजस्य करार केले आहेत. नवी दिल्ली येथे फिक्कीतर्फे शैक्षणिक मेळ्यात सहभागी झालेले शिवाजी विद्यापीठ देशातील एकमेव होते.

**प्रश्न : विद्यापीठाचे समाजाशी नाते घट्ट करण्यासाठी कोणते उपक्रम हाती घेणार आहात?**

**उत्तर :** मुळात कोल्हापूर ही वैभवशाली नगरी आहे. राजर्षी छत्रपती शाहूंच्या विचाराने चालणारी आहे. हे विद्यापीठ समाजातील प्रत्येक घटकाचे आहे. श्रमसंस्काराची पेरणी करणाऱ्या कर्मवारी भाऊराव पाटील यांच्या विचाराची, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समतावादी विचारसरणीची व राजर्षी छत्रपती शाहूंच्या दूरदृष्टीची पिढी घडविण्यासाठी समाजाची भूमिका महत्त्वाची आहे. त्यासाठी प्रत्येक कार्यक्रमात समाजाचा सहभाग वाढविणे हे माझ्यासाठी महत्त्वाचे आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 JUL 2017

लोकमत

## विद्यापीठाची आज अधिसभा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाची अधिसभा आज, बुधवारी दुपारी बारा वाजता होणार आहे. पदसिद्ध अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सभा होईल. विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहातील या सभेस कुलगुरु, प्रभारी प्र-कुलगुरु, कुलसचिव आणि विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता उपस्थित असणार आहेत. या सभेत विद्यापीठाच्या पंचवार्षिक बृहत आराखड्याबाबत प्रामुख्याने चर्चा होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 JUL 2017

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात आज अधिसभा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे बुधवारी राजर्षी शाहू सभागृहात अधिसभेचे आयोजन करण्यात आले आहे. बृहत आराखडा हा एकच विषय या अधिसभेत पुढे येण्याची शक्यता आहे. नवीन कायद्याची अंमलबजावनी झाल्यानंतरची पहिलीच अधिसभा आहे. यात प्रश्नोत्तराचा तास होणार नाही. कारण सध्या कोणत्याच अभ्यास मंडळाचे सदस्य सभागृहात नाहीत. ही शेवटची अधिसभा ठरणार आहे. त्यामुळे विद्यापीठ निवडणुकीनंतर होणाऱ्या अधिसभेत बरेच विषय पुढे येण्याची शक्यता आहे.

26 JUL 2017 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# चीन आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी ६ वैज्ञानिकांची निवड

प्रतिनिधी
कोल्हापूर

इंटरनॅशनल बॉटेनिकल कॉंग्रेस ही जागतिक परिषद प्रत्येक पाच वर्षानंतर होत असते. गतवर्षी ही परिषद मेलबोर्न (ऑस्ट्रेलिया) येथे झाली होती. यावर्षी ती चीनमध्ये शेनचेंग येथे १७ ते ३० जुलै दरम्यान होणार आहे. यामध्ये जगातील ६००० हून अधिक वनस्पतीतज्ञ भाग घेणार आहेत. या परिषदेसाठी शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र अधिविभागातील सहा वैज्ञानिकांची निवड झाली आहे.

या परिषदेमध्ये वनस्पतींचे वर्गीकरण, नामकरण आणि त्याचे नियम निश्चित केले जातात. वनस्पतीशास्त्रातील वैज्ञानिकांसाठी ही सर्वात मोठी परिषद असते. १८८५ साली परिषदेला सुरूवात झाली. आजतागायत २८ परिषदा पार पडल्या आहेत. या परिषदेमध्ये शिवाजी विद्यापीठातील वैज्ञानिक व विद्यार्थी आपले शोधनिंबध वाचणार आहेत. यामध्ये प्रो. एस. आर. यादव, डॉ. उषा यादव, डॉ. विनोद शिंपले, डॉ. नीता जाधव, डॉ. अरूण चांदोरे व डॉ. शरद कांबळे यांचा समावेश आहे.

**वनस्पती शास्त्र विभागातील सहा वैज्ञानिकांचा समावेश**

या परिषदेसाठी ते १५ जुलैला चीनला रवाना झाले आहेत. या वैज्ञानिकांपैकी दोघांना पारितोषिक म्हणून विद्यापीठाकडून रेजीस्ट्रेशन शुल्क व विमानप्रवास खर्च देण्यात आले आहे. या वैज्ञानिकांची निवड विद्यापीठासाठी अभिमानाची गोष्ट आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 JUL 2017

पुढारी

# नोंदणीकृत पदवीधरांना कागदपत्रे जमा करण्याची ३१ जुलैपर्यंत मुदतवाढ

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** पदवीधर मतदार नोंदणी केलेल्या नोंदणीकृत पदवीधरांकडून ऑनलाईन अर्ज भरून निवासाचा पुरावा सादर करण्यासाठी ऑनलाईन अर्ज २९ जुलै २०१७ पर्यंत व हार्डकॉपी विद्यापीठात जमा करण्यास ३१ जुलैपर्यंत मुदतवाढ देण्यात आली असल्याची माहिती शिवाजी विद्यापीठ प्रशासनाकडून कळवण्यात आली आहे. याबाबत प्रशासनाने माहिती दिली आहे, अकृषी विद्यापीठांच्या कुलसचिवांसोबत झालेल्या बैठकीत यापूर्वी मतदार नोंदणी केलेल्या पदवीधरांकडून परिनियमानुसार रहिवाशी दाखल्याचा पुरावा घेण्यात यावा, असा निर्णय झाला आहे. यानुसार पदवीधर मतदारांकडून रहिवाशी दाखल्याचा पुरावा घेऊन त्यांचे अर्ज अद्यावत करण्याचे काम सुरू असून त्याची मुदत २४ जुलैपर्यंत होती. परंतु, विविध संघटनांकडून पदवीधर मतदार नोंदणीसाठी अर्ज भरण्याची मुदत वाढविण्याबाबत विनंती करण्यात आली होती.

26 JUL 2017 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ निवडणूक : पदवीधर नावनोंदणीसाठी मुदतवाढ

प्रतिनिधी
कोल्हापूर

नवीन विद्यापीठ कायद्यानुसार विद्यापीठ निवडणूक प्रक्रिया राबवली जाणार आहे. पदवीधर नावनोंदणीचा सोमवार २४ जुलै शेवटचा दिवस होता. मात्र विविध विद्यार्थी संघटनांच्या विनंतीवरून २०१५ मध्ये नावनोंदणी केलेल्या पदवीधरांना ऑनलाईन अर्ज भरून निवासाचा पुरावा सादर करण्यासाठी २९ जुलैपर्यंत व हार्डकॉपी विद्यापीठात जमा करण्यासाठी ३१ जुलैपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले आहे.

नवीन विद्यापीठ कायद्यानुसार आजतागायत १८ हजार पदवीधरांनी तर ३ हजार प्राध्यापकांनी नावनोंदणी केली आहे. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याबरोबर मुंबई येथे सर्व अकृषी विद्यापीठांच्या कुलसचिवांची निवडणुकीच्या कामातील संदिग्धता किंवा अडीअडचणी दूर करण्याबाबत २९ जून रोजी झालेल्या बैठकीमध्ये यापूर्वी मतदार नोंदणी केलेल्या पदवीधरांकडून परिनियमानुसार रहिवासी दाखल्याचा पुरावा घेण्यात यावा, असा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार पदवीधर मतदारांकडून रहिवासी दाखल्याचा पुरावा घेऊन त्यांचे अर्ज अद्ययावत करण्याचे काम सुरू आहे. विविध विद्यार्थी संघटनांकडून पदवीधर मतदार नोंदणीसाठी मुदत वाढ करावी, अशी प्रत्यक्ष भेटून व पत्राद्वारे विनंती करण्यात आली होती. त्यामुळे पदवीधर मतदार नोंदणी केलेल्या नोंदणीकृत पदवीधरांकडून ऑनलाईन अर्ज भरून निवासाचा पुरावा सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. आता जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना नावनोंदणी करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. त्यामुळे विद्यार्थी संघटनांनी विद्यापीठ प्रशासनाचे आभार मानले आहेत.

**विविध विद्यार्थी संघटनांच्या विनंतीवरून मुदतवाढीचा निर्णय**

विद्यापीठ प्रशासनाकडून अर्जांची छाननी प्रक्रिया युद्ध पातळीवर सुरू आहे. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर पुढील आठवड्यात कच्ची मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे. कच्च्या यादीसंदर्भात आलेल्या हरकतींची पुर्तता करून पक्की मतदार यादी ऑनलाईन प्रसिध्द होणार आहे. ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता आहे. विद्यापीठ निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी विद्यापीठ प्रशासन, विद्यार्थी संघटना, प्राध्यापक, संस्थापक, प्राचार्य यांचे प्रयत्न सुरू आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 JUL 2017

तरुण भारत

# एम. बी. ए. प्रवेशासाठी अतिरिक्त फेरी

**कोल्हापूर :** एम. बी. ए साठी प्रवेश घेऊ इच्छित असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी डी. टी. ई महाराष्ट्रतर्फे शिवाजी विद्यापीठातील विभाग व शासकीय संस्था यांच्यासाठी अतिरिक्त प्रवेश फेरी घेण्यात येणार आहे. तरी या फेरीमध्ये विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठातील एम. बी. ए विभागाचे संचालक डॉ. एच. एम. ठकार यांनी केले आहे. एम. बी. ए. अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी ज्या विद्यार्थ्यांनी ४ जूनपर्यंत कागदपत्रांची पडताळणी सुविधा केंद्रामध्ये (स्टुडंन्ट फॅसिलिटी सेंटर) जाऊन केली आहे. ज्या विद्यार्थ्यांचा कॅप मेरिट नंबर आहे, ते विद्यार्थी या फेरीमध्ये सहभागी होऊ शकतात. २७ जुलै रोजी संबंधीत संस्थांमध्ये शिल्लक असणाऱ्या जागा जाहीर करण्यात येतील. २८ व २९ जुलै रोजी या फेरीसाठीचे ऑनलाईन ऑप्शन फॉर्म विद्यार्थ्यांनी त्यांच्या लॉगइनमधून भरावयाचे आहेत. तसेच ३१ जुलै रोजी विद्यार्थी त्यांच्या लॉगइनमधून त्यांना कोणत्या संस्थेमध्ये प्रवेश मिळाला आहे, हे पाहू शकतील. अतिरिक्त प्रवेश फेरीमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांनी १ ते ३ ऑगस्ट दरम्यान संबंधित संस्थेमध्ये जाऊन प्रवेश निश्चित करावयाचा आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 JUL 2017
पुढारी

# एमबीए प्रवेशासाठी अतिरीक्त फेरी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

एमबीए अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांसाठी डीटीई महाराष्ट्रतर्फे शिवाजी विद्यापीठातील विभाग व शासकिय संस्था यांच्यासाठी अतिरीक्त प्रवेश फेरी आयोजित करण्यात आली आहे. ज्या विद्यार्थ्यांनी ४ जून २०१७ पर्यंत कागदपत्रे पडताळणी स्टुंडटस

मिशन ॲडमिशन

फॅसिलिटी सेंटर (एसएफसी) मध्ये जाऊन केली आहे तसेच ज्यांचा कॅप मेरिट क्रमांक आहे असे विद्यार्थी या फेरीमध्ये सहभागी होऊ शकणार आहेत. २७ जुलै रोजी शिल्लक जागा जाहीर केल्या जातील. २८ व २९ जुलै रोजी फेरीसाठीचे ऑनलाईन ऑप्शन फॉर्म विद्यार्थ्यांनी त्यांच्या लॉगइनमधून भरावयाचे आहे. तसेच ३१ जुलै रोजी विद्यार्थी त्यांच्या लॉगइन मधून त्यांना कोणत्या संस्थेमध्ये प्रवेश मिळाला आहे हे पाहू शकणार आहेत. अतिरिक्त प्रवेश फेरीत प्रवेश मिळालेल्यांनी १ ते ३ ऑगष्ट या कालावधीत सबंधित संस्थेत जावून प्रवेश निश्चित करावयाचा असल्याची माहिती विद्यापीठाच्या एमबीए विभागाचे संचालक डॉ. एच. एम. ठकार यांनी प्रसिद्धीस दिली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 JUL 2017
पुढारी

# कारगिल विजय दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात आज कँडल मार्च

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** कारगिल विजयानिमित्त शिवाजी विद्यापीठात बुधवारी (दि. २६) विद्यार्थ्यांच्या वतीने कँडल मार्चचे आयोजन करण्यात येणार आहे. सायंकाळी साडेसहा वाजता मुख्य इमारतीसमोर कँडल मार्चचे आयोजन केले जाणार असल्याचे प्रसिद्धीस देण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 JUL 2017

तरूण भारत

# ऋतुराज इंदूलकरला जलतरणमध्ये कलर ॲवॉर्ड

**कोल्हापूर :** चंदीगडमध्ये नुकत्याच झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेंतर्गत आयोजित केलेल्या १५०० मीटर जलतरण स्पर्धेत ऋतुराज इंदुलकर याने कांस्यपदक पटकावले. शिवाजी विद्यापीठाच्या संघातून तो या स्पर्धेत उतरला होता. या स्पर्धेतील त्यांच्या या कामगिरीची दखल घेऊन शिवाजी विद्यापीठाने त्याला 'कलर ॲवॉर्ड" देऊन गौरविले. ऋतुराज हा गोखले कॉलेजचा विद्यार्थी आहे. त्याला शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव प्रा. जयकुमार देसाई, पेट्रन कौन्सिलचे सदस्य दौलत देसाई, प्रशासनाधिकारी डॉ. मंजिरी देसाई–मोरे, प्रभारी प्राचार्य डॉ. ए. बी. गडकरी, जिमखाना प्रमुख प्रा. एन. आर. कांबळे, प्रा. बी. जे. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.